# विद्या सहकारी बँक लि.

स.नं.१३५५, प्लॉट नं.७२, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे
फोन नं. ०२०-२४४७७७४८/४९
Visit us - www.vidyabank.com Email - vidya.ho@vsnl.net

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना केवळ सभासदांकरीता

**विद्या सहकारी बँकेच्या सर्व सभासदांची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २२/०९/२०१३ रोजी सकाळी १०.०० वाजता 'एस. एम. जोशी सोशलिस्ट फौंडेशन' सदाशिव पेठ, पत्रकार भवन शेजारी, पुणे - ३० येथे** आयोजित करण्यात आली आहे. तरी आपण सदर सभेस उपस्थित राहावे, ही विनंती.

**कार्यक्रमपत्रिका :**

१) दि. १२/०८/२०१२ रोजी झालेल्या बँकेच्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे तसेच दि. २०/०४/२०१३ रोजी झालेल्या बँकेच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने सादर केलेला वर्ष २०१२-१३ चा अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक स्वीकृत करणे व सभासदांकडून अहवालासंबंधी आलेल्या लेखी प्रश्न /सूचनांचा विचार करणे.

३) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.

४) वर्ष २०१२-१३ च्या अंतर्गत लेखापरिक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.

५) वर्ष २०१२-१३ च्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.

६) वर्ष २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी मा. वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करण्याचे व त्यांचे मानधन ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.

७) मा. संचालक मंडळाने वर्ष २०१३-१४ साठी केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षकांच्या नेमणूकीस व मानधनास मान्यता देणे.

८) मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांच्या कर्जाची माहिती घेणे.

९) वर्ष २०१२-१३ या वर्षात थकित कर्जवसुलीच्या दृष्टीने संचालक मंडळाने शिफारस केलेल्या व्याजाच्या सवलतीस मान्यता देणे.

१०) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ४९ नुसार वसुलीचा हक्क अबाधित राखून मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या बुडित कर्जाच्या निर्लेखनास मान्यता देणे.

११) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार

स्थळ : पुणे
दिनांक : ०२/०९/२०१३

**(लक्ष्मण श्रीपाद बेहेरे)**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी**

**विशेष सूचना :**

गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. त्यावेळी आवश्यक गणसंख्या नसली तरीही सभेचे कामकाज चालविण्यात येईल.

**सभासदांसाठी सूचना :**

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये निर्देशित केलेल्या विषयासंबंधीची जरुर ती कागदपत्रे मुख्य कार्यालयात दि. १०/०९/२०१३ पर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) सकाळी १०.३० ते दुपारी २.०० या वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध केली आहेत. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषयांबाबत ज्या सभासदांना माहिती हवी असेल अथवा काही सूचना करावयाच्या असतील अथवा काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. १०/०९/२०१३ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत मुख्य कार्यालयात लेखी स्वरुपात विचारणा करावी.

**सभेस येताना अहवालाची प्रत बरोबर आणावी.**

**टीप:**

रु.१.०० लाखावरील मुदत ठेव धारकांना देखील सभेस हजर राहता येईल. मात्र येताना त्यांनी आपली मुदतठेव पावती अथवा त्याची झेरॉक्स प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.